# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:25.12.2025** **वार:गुरुवार**

1. पंतप्रधानच्या हस्ते आज राष्ट्र प्रेरणा स्थळाचं उद्घाटन
2. अरवली पर्वतरांगेतील खनिजांच्या नवीन खाणपट्ट्यांवर केंद्राद्वारे बंदी
3. देशभरात नाताळच्या सणानिमित्त उत्साहाचं  वातावरण
4. भारतीय पुरुष हॉकी संघाचा उपकर्णधार हार्दिक सिंहला मेजर ध्यान चंद खेल रत्नसाठी नामांकन

**पीएम-लखनौ**

माजी पंतप्रधान भारत रत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या 101व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आज लखनौला भेट देणार आहेत. दुपारी 2:30 वाजता, मोदी यांच्या हस्ते राष्ट्र प्रेरणा स्थळाचं उद्घाटन होणार असून, त्यानंतर ते तिथल्या जनसभेला संबोधित करतील. स्वतंत्र भारतातील महान व्यक्तिमत्त्वांच्या वारशाला सन्मान देण्याचा पंतप्रधान मोदी यांचा हा संकल्प आहे. देशाच्या लोकशाही, राजकीय क्षेत्र आणि देशाच्या विकासात खोल प्रभाव पाडणाऱ्या महान नेत्यांच्या जीवन आणि आदर्शांप्रती ही श्रद्धांजली आहे. राष्ट्र प्रेरणा स्थळ हे एक प्रमुख राष्ट्रीय स्मारक आणि प्रेरणादायी परिसर म्हणून विकसित करण्यात आलं आहे. सुमारे 65 एकर परिसरात ते 230 कोटींच्या निधीतून बांधण्यात आलं आहे.

**नायडू-निवड**

नवी दिल्लीतल्या अटल स्मृती न्यास संस्थेच्या अध्यक्षपदी माजी उपराष्ट्रपती एम. वेंकय्या नायडू यांची निवड करण्यात आली आहे. न्यासाचे संस्थापक सदस्य राम बहादुर राय यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अन्य सदस्यांशी चर्चा करून अध्यक्ष पदासाठी नायडू यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. अटल स्मृती न्यास संस्थेचे अध्यक्ष विजय कुमार मल्होत्रा यांचं नुकतंच निधन झालं. न्यासाचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून नायडू न्यासाच्या व्यवस्थापनासाठी कार्यकारिणी समिती स्थापन करतील.

**अरवली पर्वत**

दिल्ली ते गुजरातपर्यंत पसरलेल्या संपूर्ण अरवली पर्वतरांगेचे अवैध खाणकामापासून संरक्षण करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत, केंद्राने राज्यांना अरवली पर्वतरांगेत कोणत्याही नवीन खाणपट्ट्या मंजूर करण्यावर संपूर्ण बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने एका निवेदनात पर्वतरांगेची अखंडता टिकवून ठेवण्यासाठी ही बंदी संपूर्ण अरवली प्रदेशात समान रीतीने लागू होणार असल्याचं म्हटलं आहे.

दरम्यान कॉंग्रेससह काही राजकीय पक्षअरवली पर्वतांवरील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाबाबत गैरसमज पसरवत असून ते जाणीवपूर्वक सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा विपर्यास करत आहेत आणि आपल्या स्वार्थासाठी त्याचा राजकीय हत्यार म्हणून वापर करत आहेत अशी टीका केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी केली आहे.सर्वोच्च न्यायालयाचा निकाल अरवली प्रदेशातील अवैध खाणकामावर बंदी घालण्याबाबत असून हा प्रदेश महत्त्वाच्या खनिजांचा प्रमुख स्रोत आहे. तसंच तो देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासासाठी आवश्यक असून केंद्र सरकार त्याच्या संवर्धनासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे. अरवली प्रदेशातील पडीक जमिनींवर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केलं जात असल्याचंही यादव यांनी म्हटलं आहे.

**नड्डा**

देशात मलेरियाच्या रुग्णांमध्ये 80 टक्क्यांहून अधिक आणि मृत्यूंमध्ये 78 टक्क्यांनी घट झाली असल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी काल सांगितलं. सार्वजनिक आरोग्य निष्कर्ष मंचाच्या कार्यक्रमात काल नवी दिल्ली इथं बोलताना नड्डा म्हणाले की, 30 हजारांहून अधिक आयुष्मान आरोग्य मंदिरांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकाचं प्रमाणपत्र मिळालं आहे. दर दोन

हजार लोकसंख्येमागं एक आयुष्मान आरोग्य मंदिर स्थापन करण्याचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी नमूद केलं. या कार्यक्रमादरम्यान नड्डा यांनी मलेरिया, क्षयरोग, लिम्फॅटिक फायलेरियासिस आणि लसीकरण या क्षेत्रांतील भारताच्या कामगिरीवर प्रकाश टाकणारे चार अहवाल देखील प्रकाशित केले.

**<u>तमिलनाडु पक्षीगणना</u>**

तमिळनाडू वन विभागाने 2025–2026 या वर्षासाठी एक समन्वित पक्षीगणना करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. ही पक्षी गणना दोन टप्प्यांमध्ये पार पाडली जाईल. या उपक्रमात जलाशयातले पक्षी मोजणी आणि जंगलातील पक्षी गणना यांचा समावेश असेल. गेल्या वर्षीच्या मोजणीत, स्थलांतरित तसेच स्थानिक पक्षी अशा एकंदर 397 पक्षी प्रजाती नोंदवल्या गेल्या होत्या.

**<u>युक्रेन-प्रस्ताव</u>**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी एक नवीन शांतता प्रस्ताव सादर केला असून, रशियानं सैन्य माघारी घेतल्यास आणि निःशस्त्रीकरण क्षेत्र निर्मितीच्या बदल्यात पूर्व डोनबास भागातून युक्रेनचं सैन्य मागं घेण्याची तयारी दर्शवली आहे. फ्लोरिडामध्ये अमेरिका आणि युक्रेनच्या दूतांनी चर्चा करुन या 20-कलमी योजनेवर सहमती दर्शवली. झेलेन्स्की म्हणाले की, कोणत्याही अंतिम करारावर सार्वमत घेतलं जाईल. या प्रस्तावात पूर्वीच्या 28-कलमी अमेरिकी योजनेत सुधारणा सुचवल्या आहेत कारण तो रशियासाठी खूपच अनुकूल असल्याची प्रतिक्रिया युरोपीय आणि युक्रेनियन नेत्यांनी मांडली होती. रशियानं आतापर्यंत व्यापलेल्या प्रदेशातून माघार घेण्याची कोणतीही तयारी दाखवलेली नाही आणि युक्रेननं डोनबासचं उर्वरित क्षेत्र सोडून द्यावं ही त्याची मागणी झेलेन्स्की यांनी फेटाळून लावली आहे.

**<u>कॅलिफोर्निया पाऊस</u>**

अमेरिकेत, कॅलिफोर्नियाचे राज्यपाल गॅव्हिन न्युसॉम यांनी मुसळधार पाऊस आणि जोरदार वादळाच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थिती जाहीर केली आहे. दक्षिण कॅलिफोर्नियात मोठ्या स्वरूपाच्या पुराची शक्यता न्युसॉम यांनी व्यक्त केली आहे. यादरम्यान झाडं पडण्याची आणि वीज पुरवठा खंडित होण्याची शक्यता ही वर्तवण्यात आली आहे.

**<u>बांगलादेश-स्फोट</u>**

बांगलादेशात ढाका इथं, काल संध्याकाळी एका पुलावरून फेकलेल्या बॉम्ब मुळे एका तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस CCTV फूटेज तपासत असून स्फोट घडवणाऱ्या व्यक्तीचा शोध घेत आहेत. राजधानीत या महिन्याच्या सुरुवातीलाही घडलेल्या अशा बॉम्ब स्फोटाच्या घटनांमुळे या हल्ल्यावर पुन्हा चिंता निर्माण झाली आहे.

**<u>नवी मुंबई- विमानतळ</u>**

अत्याधुनिक ग्रीनफिल्ड विमानतळ म्हणून नावजले गेलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन आजपासून प्रवासी सेवा सुरु होत आहे. यासोबतच मालवाहतूकही सेवा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी काल पत्रकार परिषदेत दिली.15 जानेवारीपर्यंत दररोज 48 विमानं उड्डाण करणार आहेत. तर दरवर्षी अंदाजे 9 कोटी प्रवासी प्रवास करतील असंही म्हणाले.

**<u>एआई कौशल्य</u>**

कौशल विकास आणि उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांनी जागतिक स्तरावरील प्रशिक्षण प्रणाली तयार करण्यासाठी सरकार, उद्योग, शैक्षणिक आणि प्रशिक्षण संस्था यांच्या कृत्रिम बुद्धिमत्ता क्षमतांचा विकास करण्यावर भर दिला आहे. नवी दिल्लीत, कौशल्य विकास या विषयावरील झालेल्या बैठकीच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना चौधरी म्हणाले की शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि कार्यक्षमतेत कृत्रिम बुद्धिमत्ता कौशल्य समाविष्ट करून सरकार जागतिक अर्थव्यवस्थेत विकसित भारताची पायाभरणी करत आहे. या बैठकी दरम्यान आरोग्य, पुनर्निर्मिती, सेवा आणि सुशासन यांच्यात संशोधन आणि अभियांत्रिकी पासून विशेष क्षेत्रातल्या अनुप्रयोगांपर्यंत AI प्रतिभा विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आल्याचं कौशल्य विकास मंत्रलयांनं सांगितलं.

**<u>दिल्ली स्फोट</u>**

दिल्लीतल्या एका न्यायालयानं लाल किल्ला स्फोट प्रकरणातील सात आरोपींच्या न्यायालयीन कोठडीची मुदत 15 दिवसांनी वाढवली असून त्यांना 8 जानेवारीपर्यंत तुरुंगात ठेवण्याचे आदेश दिले आहेत. अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रशांत शर्मा यांनी या आरोपींना

काल पाटियाला हाऊस न्यायालयात हजर केल्यानंतर, न्यायालयीन कोठडी साठी सुपूर्द केल. यापूर्वी, 12 डिसेंबरला तीन डॉक्टर आणि वागे यांना 12 दिवसांच्या तर अली आणि वानी यांना 10 डिसेंबरला 14 दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले होते. सोयाबला 19 डिसेंबरला पाच दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले होते.

**निधन-नंदुरबार**

कॉग्रेसचे जेष्ठ नेते सुरुपसिंग नाईक यांचे काल वृद्धापकाळाने काल निधन झाले. ते 88 वर्षांचे होते. महाराष्ट्राच्या मंत्रीमडंळात अनेक खात्यांचे कॅबीनेट मंत्रीपद भुषवलेले सुरुपसिंग नाईक 1985 पासून सातत्याने विधानसभेत निवडून आले. आपल्यातील शैक्षणिक दृष्टी जोपासत त्यांनी आदिवासी सेवा सहाय्यक आणि शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून नवापुर तालुक्यात मोठ्या शिक्षण संस्थेचं जाळं विणलं. सहकारातून समृद्धी हे उद्दिष्ट ठेवत त्यांनी आदिवासी सहकारी साखर कारखाना डोकारेची पायाभरणी केली. धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातल्या अनेक योजना आणि विकास कामांमध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.

**नाताळ**

देशभरात ख्रिसमसचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या निमित्तानं विविध ठिकाणी गिरीजाघरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. बाजारपेठादेखील ख्रिसमसच्या वस्तूंनी फुलल्या आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ख्रिसमसनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. ख्रिसमस हा आनंद आणि उत्साहाचा सण आहे, प्रेम आणि करुणेचा संदेश देतो तसच हा सण मानवतेच्या कल्याणासाठी प्रभू येशू ख्रिस्तांनी केलेल्या त्यागाची सर्वांना आठवण करून देतो असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. मुंबई शेअर बाजार तसंच राष्ट्रीय शेअर बाजार आज बंद राहणार आहेत.

**खेलरत्न पुरस्कार**

भारतीय पुरुष हॉकी संघाचा उपकर्णधार आणि दोनवेळा ऑलिंपिक कांस्यपदक पटकावणारा हार्दिक सिंह याला देशाचा सर्वोत्कृष्ट क्रीडा सन्मान, मेजर ध्यान चंद खेल रत्नसाठी नामांकन मिळाले आहे. ऑलिंपिक पदक विजेता आणि भारतीय हॉकी संघाचा उपाध्यक्ष गगन नारंग, माजी हॉकीपटू एम. एम. सोमाया आणि माजी बॅडमिंटनपटू अपर्णा पोपट यांच्या निवड समितीने काल ही घोषणा केली.

हार्दिकनं, 2020 मध्ये टोक्यो आणि 2024 मध्ये पॅरिस ऑलिंपिकमध्ये कांस्यपदक जिंकण्यात महत्वाचं योगदान दिलं आहे. दरम्यान, 24 क्रीडापटूंना अर्जुन पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. यामध्ये प्रथमच योगासनासाठी आरती पाल, रायफल साठी मेहुली घोष, महिला बॅडमिंटन जोडी ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांचाही समावेश आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.